☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/374/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 दिनांक : 08/10/2025

## ''पोलीस स्टेशन किनवट येथील बलात्काराच्या गुन्ह्यामधील आरोपीस मा.न्यायालयाने ठोठावली जन्मठेपेची व द्रव्यदंडाची शिक्षा...''

पोलीस स्टेशन किनवट हद्दीत किनवट ते बोधडी रोडवरील टिंगनवाडी आश्रम शाळेजवळील जंगलात यातील अल्पवयीन तक्रारदार हिचेवर यातील आरोपी नामे महेश धोंडीबा भडंगे, रा.बोधडी बु किनवट याने बलात्कार केला बाबतचे तक्रारीवरून पोलीस स्टेशन किनवट येथे गु.र.नं. 147/2023 कलम 366(अ),376,376(2)(एन),377,506 भादवी सहकलम 4,6 बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोउपनि श्री मिथुन सावंत यांनी उत्तम प्रकारे करून गुन्ह्यात भक्कम पुरावे गोळा केले व मा. न्यायालयात आरोपी विरूध्द दोषारोप पत्र सादर केले. सदर प्रकरणात मा.श्री वेदपाठक साहेब, जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड यांचे कोर्टाने दि.07/10/25 रोजी सरकार पक्षाच्या वतीने पुरावे ग्राहय धरून आरोपी नामे महेश धोंडीबा भडंगे, रा.बोधडी बु किनवट यास कलम 377 भादवी अंतर्गत दहा वर्षे शिक्षा व चार हजार रूपये द्रव्यदंड, कलम 4 बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम प्रमाणे विस वर्षे शिक्षा व तिन हजार रूपये द्रव्यदंड व कलम 6 बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम प्रमाणे जिवंत असेपर्यंत जन्मठेप व चार हजार रूपये द्रव्यदंड आणी द्रव्यदंड न भरल्यास पाच वर्षे कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

**मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पोस्टे स्थरावर दाखल गुन्हयामध्ये आरोपींना तात्काळ अटक करून, भक्कम पुरावे गोळा करून मा.न्यायालयात लवकरात लवकर दोषारोप पत्र दाखल करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी यांना आदेशीत केले व मा. न्यायालयात चालू असलेल्या खटल्यांमध्ये विशेष लक्ष देणे बाबत सुचित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता श्रीमती बत्तुला डांगे मॅडम यांनी सरकार पक्षाची बाजु मांडली असुन श्री देविदास चोपडे, प्रभारी अधिकारी पोस्टे किनवट यांचे मार्गदर्शनाखाली संपुर्ण खटल्याचे दरम्यान कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोहेकॉ/विजय वाघमारे, यांनी कामकाज पाहीले.

सदर प्रकरणी **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांनी पोस्टे किनवट तपास अधिकारी व पैरवी अधिकारी यांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड